गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक २८ वा ● शुक्रवार १४ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 28 | Date : 14/06/2024 blow Friday Page 4 Price 4


### भारत सरकारकडून नियुक्तीपत्र जाहीर

# अजित डोवाल तिसऱ्यांदा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पदी

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

गुप्तचर संघटनेचे माजी प्रमुख अजित दोवल यांची तिसऱ्यांना राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारत सरकारकडून यासंदर्भातील नियुक्ती पत्र जारी करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे सर्वाधिक काळ राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी राहणारे अजित डोवाल हे देशातील पहिले अधिकार आहेत. यापूर्वी २०१४ आणि २०१९ साली त्यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली होती.

भारत सरकारकडून जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्रानुसार, अजित डोवाल यांना १० जूनपासून भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी पदावर असेपर्यंत किंवा पुढील निर्देशांपर्यंत अजित डोवाल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार असतील, असं या नियुक्तीपत्रात म्हटलं आहे. याशिवाय प्रमोद कुमार मिश्रा यांनी पंतप्रधानांचे मुख्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे.अजित डोवाल हे १९६८ च्या आयपीएस केडरचे अधिकारी होते. सैन्याकडून देण्यात येणार्या किर्ती चक्राने सन्मानित करण्यात आलेले ते पहिले पोलिस अधिकारी आहेत. २००५ साली इंटेलिजेंस ब्युरोच्या प्रमुख पदावरून निवृत्त झाले. अजित डोवाल यांचे गुप्तचर यंत्रणेमधील काम वाखाणण्याजोगे होते. १९९९ साली कंधारमध्ये इंडियन एअरलाइनचे आयसी ८१४ विमान अपहरणकर्त्यांकडून अपहरण करण्यात आले होते. त्यावेळी अपहरणकर्त्यांबरोबर वाटाघाटी करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा होता.याशिवाय १९८४ मध्ये खलिस्तानी आतंकवादीविरोधात चालवण्यात आलेल्या ऑपरेशन ब्ल्यु स्टारमध्ये देखील त्यांनी महत्त्वाची भूमिका बजवली होती. यात ते सीक्रेट एजेंट बनून रिक्षावाल्याच्या पेहराव



करून सुवर्ण मंदिरात गेले होते. उरी हल्लयानंतर सर्जिकल स्ट्राईकचे नियोजन आणि धोरण ठरवण्यात त्यांचा महत्वाचा वाटा होता.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या पाठपुराव्याला यश

## जिल्ह्यातील १ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर विमा कंपनीकडून ११३ कोटींचे अग्रीम जमा

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप - २०२३ हंगामामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ६ लाख ७६ हजार ३११ शेतकऱ्यांनी ५ लाख २३ हजार १७७ हेक्टर क्षेत्रासाठी पिक विमा कंपनीकडे विमा भरलेला होता. खरीप हंगाम २०२३ अंतर्गत प्रतिकूल परिस्थितीच्या अनुषंगाने अधिसूचित सर्व पिकासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अधिसूचना निर्मित करून २५ टक्के अग्रीम नुकसान भरपाई देण्याबाबत पिक विमा कंपनीस आदेशित केले होते. त्या अनुषंगाने



जिल्हाधिकारी यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावाला यश येऊन विमा कंपनीने बाजरी, मका व सोयाबीन पिकासाठी १ लाख ९० हजार ४५८ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ११३ कोटी ८२ लाख रुपयांचा निधी थेट जमा केला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी दिली.

ओरिएंटल विमा कंपनीकडून मका, सोयाबीन व बाजरी पिकासाठी २५ टक्के अग्रीम म्हणून वाटप केलेला निधी व शेतकऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे....

१. अक्कलकोट -२१ हजार ८८५ शेतकऱ्यांना १२ कोटी ४९ लाख ८५ हजार, २. बार्शी- ८८ हजार ४०२ शेतकऱ्यांना ५९ कोटी ३२ लाख ३२ हजार, ३. करमाळा- ५९५९ शेतकऱ्यांना ८६ लाख ८४ हजार, ४. माढा- २६७१ शेतकऱ्यांना २७ लाख २८ हजार, ५. माळशिरस- आठ हजार ९१ शेतकऱ्यांना

**✲ ओरिएंटल विमा कंपनी सोबत पिक विमा मंजूर करण्यासाठी आठ बैठका, कृषी आयुक्त, कृषी सचिव, कृषी मंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा ✲ पिक विमा कंपनीने सोयाबीन, मक्का व बाजरी या पिकांसाठी २५ टक्के अग्रीम म्हणून ११३.८२ कोटी वाटप**

एक कोटी ६२ लाख २६ हजार, ६. मंगळवेढा दहा हजार एकशे सहा शेतकऱ्यांना २६ कोटी ९ लाख ११ हजार, ७. मोहोळ- ११ हजार ७४१ शेतकऱ्यांना ७ कोटी ८ लाख ३१ हजार, ८. पंढरपूर- ८२१ शेतकऱ्यांना ८ लाख ८० हजार, ९. सांगोला- १४ हजार २४८ शेतकऱ्यांना ४ कोटी ३७ लाख २१ हजार, १०. सोलापूर उत्तर- १५ हजार ६२७ शेतकऱ्यांना १३ कोटी ८६ लाख ८८ हजार व सोलापूर दक्षिण दहाच्या ९७९ शेतकऱ्यांना अकरा कोटी तेरा लाख ८२ हजार असे एकूण १ लाख ९० हजार ४५८ शेतकऱ्यांना ११३ कोटी ८२ लाख ३८ हजाराचा निधी विमा कंपनीकडून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्यात आला, अशी माहिती श्री. गावसाने यांनी दिली.

✲नैसर्गिक आपत्तीतील शेतकऱ्यांना निधी वाटप कारवाही सुरू : तसेच जिल्ह्यामध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने ६५ हजार ९१८ शेतकऱ्यांनी पुर्व सुचना दिल्या होत्या. त्यापैकी ५९ हजार ११० शेतकऱ्यांचे पंचनामे पुर्ण करून त्यापैकी २५ हजार ९५४ पात्र शेतकऱ्यांना । **पान २ वर**

# सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

बारामती लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे यांच्याकडून पराभूत झालेल्या सुनेत्रा पवार यांची अखेर राज्यसभेत बिनविरोध निवड झाली आहे. आज त्यांनी विधानसभेत जाऊन उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानतंर अर्ज दाखल करण्याची मुदत संपली असून एकही अर्ज आलेला नाही. त्यामुळे सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड झाली आहे.उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आज दुपारी ३ वाजेपर्यंत अंतिम मुदत होती. परंतु, ३ वाजेपर्यंत सुनेत्रा पवारांशिवाय कोणाचाही अर्ज न आल्याने सुनेत्रा पवारांची बिनविरोध झाली. आज त्यांनी दुपारी विधानसभेत जाऊन उमेदवारी अर्ज भरला. महायुतीच्या वतीने भाजपाच्या कोट्यातून त्यांनी हा अर्ज भरला होता.

उमेदवारी अर्ज भरल्यानंतर सुनेत्रा पवारांनी माध्यमांशी संवाद साधला होता. त्यावेळी त्या म्हणाल्या, पक्षाने मला राज्यसभेची अधिकृत उमेदवारी दिली आहे, त्याबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, इतर नेते आणि पदाधिकाऱ्यांचे मी आभार मानते.दरम्यान, सुनेत्रा पवार यांना यावेळी विचारण्यात आलं की तुमचा पक्ष केवळ अजित पवार यांच्या कुटुंबापुरता सीमित झाला आहे अशी टीका होत आहे, त्याबाबत काय सांगाल? त्यावर सुनेत्रा पवार म्हणाल्या, माझ्या उमेदवारीचा निर्णय पक्षातील सर्व वरिष्ठ नेत्यांनी मिळून घेतला आहे. आज माझा उमेदवारी अर्ज भरताना स्वतः छगन भुजबळ यांच्यासह पक्षातील इतर नेतेही उपस्थित होते. त्यांनी मला शुभेच्छा दिल्या. त्यामुळे मी ठामपणे । **पान २ वर**

# बीए, बीकॉम, बीएससी, बीसीए, बीबीए अंतिमचे निकाल ३० दिवसांत जाहीर!

### सोलापूर विद्यापीठ: परीक्षा संचालक डॉ. अंधारे यांची माहिती

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ।। विद्यया संपन्नता ।।

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बीए, बीकॉम, बीएससी, बीसीए आणि बीबीए अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे निकाल ३० दिवसांत जाहीर झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षा । **पान २ वर**

### बी टेक अंतिम वर्षाचे निकाल पंधरा दिवसात

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून यंदा अभियांत्रिकीच्या बी टेक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाचे सर्व निकाल पंधरा दिवसात जाहीर झाल्याची माहिती देखील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डोस श्रीकांत अंधारे यांनी दिली.

# पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत मिळावी यासाठी केंद्रीय कृषि मंत्र्यांना देखील भेटणार : मुख्यमंत्री

## देशात पहिल्यांदाच केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस मुख्यमंत्री उपस्थित चांगला पायंडा पडल्याने प्रतिनिधींकडून समाधान व्यक्त

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा आणि अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत. राज्यातील सरकार शेतकऱ्यांच्या हिताचेच निर्णय घेत आहे, असे सांगून केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाच्या माध्यमातून देखील पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळून त्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. आज केंद्रीय कृषि





मूल्य व किंमत आयोगाच्या बैठकीस उपस्थित राहून एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारे शेतकऱ्यांविषयीची वचनबद्धता प्रकट केल्याबद्दल या बैठकीस उपस्थित विविध राज्यांच्या प्रतिनिधींनी टाळ्या वाजवून प्रशंसाही केली. रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किंमत । **पान २ वर**





**महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबा देशमाने यांनी दिल्लीत नुतन क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांची मंत्रालयात भेट घेऊन वृत्तपत्राच्या अर्थकारणावरील पुस्तिका देऊन चर्चा केली.तर माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड यांचीही भेट घेऊन प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करण्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रुपये सूट द्यावी या मागणीबाबत चर्चा केली. सोबत पत्रकार संघाचे भगीरथ तोडकरी.**

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून ‘पीएमयू’च्या बैठकीत राज्यातील विकासप्रकल्पांचा आढावा

# पायाभूत विकासप्रकल्पांची कामे नियोजनानुसार गतीने मार्गी लावा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्याचा दीर्घकालीन विकास डोळ्यासमोर ठेऊन राज्यात विविध विभागांच्या मार्फत विकासकामे सुरू आहेत. नागरिकांच्यादृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाला आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांना विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ होण्यासाठी राज्यात सुरू असलेली आणि प्रस्तावित विकासकामे नियोजनानुसार गतीने पूर्ण करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात झालेल्या उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाच्या (प्रोजेक्ट मॉनिटरिंग युनीटच्या) बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीस महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे (व्हिसीद्वारे), राज्याचे मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव व विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त व क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, परिवहन आणि बंदरे, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव (नवि-१) असीमकुमार गुप्ता, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा राज्यकर आयुक्त आशिष शर्मा, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, पुणे मेट्रो क्रमांक तीन च्या कामाला वेग द्यावा. नागरिकांच्यादृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या पुणे । **पान २ वर**



दैनिक
यश सिद्धि न्यूज


## संपादकीय

### कान टोचले हे बरे झाले..

निवडणुकीत मतदारांनी भाजपला बहुमतापासून रोखले परंतु, एनडीएलाही सत्तास्थापण्यासाठी काठावरच पास केले. मोदी स्वतःला प्रधान सेवक आणि चौकीदार समजतात. परंतु, सेवक कसा असावा, याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलेले विश्लेषण मोदी यांना चपखलपणे लागू होऊ शकते. गेल्या दहा वर्षांत मोदींची एकाधिकारशाही होती. ते फार अहंकारी असल्याचे विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून वारंवार टीका केली जाते. राष्ट्रीय मुद्द्यांवरही ते विरोधी पक्षांचे मत विचारात घेत नाहीत. वास्तविक पाहता राष्ट्रीय सुरक्षेच्या प्रश्नांवर तरी सर्वपक्षीय मतांचा विचार सत्ताधाऱ्यांनी करायला हवा. या पार्श्वभूमीवर भागवत यांनी सुनावलेले विचार मोदी यांना आत्मपरीक्षण करायला लावणारे आहेत. काम करा पण भारावू नका, खरा सेवक हा अहंकारी नसतो हे भागवत यांचे विचार अप्रत्यक्षपणे मोदी यांनाच लागू होतात. निवडणुका या अपरिहार्य असतात. मात्र, तंत्रज्ञानाचा गैरवापर करणे, खोटेपणा पसरवणे हे अपेक्षित नाही, असे भागवत यांना वाटते. लोकसभा निवडणूक प्रचारात मोदी यांची स्टॅटेजी सतत बदलत गेली. जनमत विरोधात जात असल्याचे समजू लागल्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्ता आली तर तुमच्या गळ्यातील मंगळसूत्रही काढून घेतले जाईल असे अतार्किक विधान मोदी यांच्याकडून केले गेले. जनतेला भेडसावणाऱ्या आणि ज्वलंत प्रश्नांच्या मुद्द्यांवर त्यांची सभा गाजलीच नाही. गेल्या दहा वर्षांत सीमेपलीकडून होणाऱ्या अतिरेक्यांच्या हालचाली कमी झाल्या असल्या तरी मणिपूरमधील रक्तरंजित हिंसाचार थांबवण्यात मोदींना लक्ष घालावेसे का वाटू नये? जगभरातील देशांकडून या घटनेची निंदा झाली. तरीही मणिपूरमधील जातीय दरी दूर करून सामाजिक एकोपा निर्माण करण्यात मोदी यांनी लक्ष घातले नाही. नेमक्या याच गोष्टीवर बोट ठेवत दीड वर्षांपासून जळत असलेल्या मणिपूरमधील परिस्थिती पूर्वपदावर आणावी लागेल, याकडे सरसंघचालकांनी उशिरा का होईना मोदी यांचे लक्ष वेधले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजपची मातृ संस्था आहे. या शक्तिस्थळावरच देशभरात भाजपची ताकद वाढली, अनेक राज्यात सत्ता आली. मात्र, भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी अलीकडेच निवडणूक प्रचारादरम्यान भाजपला आता आरएसएसची गरज नाही, असे धक्कादायक विधान केले होते. त्याला तत्काळ संघाकडून प्रत्युत्तर दिले गेले नाही. मात्र, आता योग्य वेळ आल्यानंतर या संस्थेचे कुटुंबप्रमुख असलेल्या भागवत यांनीच मोदी आणि त्यांच्या स्तुतिपाठकांचे कान टोचले हे बरे झाले.

पान १ वरुन

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद ..


रक्कम रुपये २४.९५ कोटी निधी वितरीत करण्याची कार्यवाही पिक विमा कंपनी मार्फत सुरू आहे. तसचे काढणी पश्र्चात नुकसानी अंतर्गत २१ हजार ३८४ पुर्व सुचनापैकी १४ हजार ४५४ पंचनामे पुर्ण झाले असुन या शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची परिगणना करण्याची कार्यवाही पिक विमा कंपनीस्तरावर सुरू आहे. तसेच पिक कापणी प्रयोगातील उत्पादनाच्या आधारे अंदाजे १ लाख ८० हजार शेतक-यांना रक्कम रुपये ७०.४७ कोटी नुकसान भरपाई देय आहे. परंतु हंगामामध्ये प्रतिकुल परिस्थिती, स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्र्चात नुकसानीच्या वैयक्तीक पुर्व सुचनेतील लाभार्थ्यांचा यामध्ये समावेश असल्याने वैयक्तीक पंचनाम्यातील शेतक-यांचा निधी वितरीत केल्यानंतर उर्वरीत देय रक्कम पिक कापणी प्रयोगातील उत्पादनाच्या आधारे अदा करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने मुग, उडीद व बाजरी या पिकांचा समावेश असल्याची माहिती पिक विमा कंपनीने दिली असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री.गावसाने यांनी कळविले आहे.

*पिक विमा अग्रिम मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा पाठपुरावा-

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२३ अंतर्गत सोलापूर जिल्हयात माहे ऑगस्टमध्ये पावसातील खंडामुळे खरीप पिकांच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता लक्षात घेता प्रधानमंत्री पिक विमा योजनेतंर्गत जिल्ह्यातील ९२ महसूल मंडळे व ८ तालुक्यातील विमाधारक शेतकऱ्यांना संभाव्य नुकसान भरपाई रक्कमेच्या २५ टक्के आगाऊ रक्कम देणेबाबत पिक विमा कंपनीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद जिल्हास्तरवर झालेल्या आठ बैठकांमध्ये तसेच लेखी पत्राद्वारे वांरवार सूचना देऊन तसेच अपर मुख्य सचिव कृषि विभाग, आयुक्त कृषि महाराष्ट्र राज्य यांचेशी दुरध्वनीद्वारे तसेच कृषि मंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री सोलापूर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली. त्याप्रमाणेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पाठपुरावा केला होता. तर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केलेला होता. तसेच जिल्ह्यातील अन्य लोकप्रतिनिधी ही शेतकऱ्यांना पीक विमा अग्रीम मिळण्यासाठी पाठपुरावा करत होते.

# भारतीय संविधानावर बुद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव : ज.वि.पवार

**पुणे/दैनिक यशसिध्दी न्युज**



भारताची राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ आणि प्रदिर्घ लिखित राज्यघटना मानली जाते. विविध धर्म, पंथ, समुदाय, प्रांत, भाषा असुनही भारतीयांमध्ये एकता आणि एकात्मता संविधानिक मुल्य ही श्रेष्ठ असल्याचे दिसून येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे मागिल एक वर्षापासून दररोज सकाळी दहा वाजता संविधान प्रास्ताविकेचे वाचन आणि तद्नंतर दहा मिनिटे आनापान (चशवळींरींळेप) केले जाते. बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांचे संकल्पनेतून सदरचा उपक्रम सुरू असुन महाभीमकाव्य हा उपक्रमही त्यांनी हाती घेतला आहे.

संविधान उद्देशिका वाचन या अभिनव उपक्रमास शुभेच्छा देण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत पथर ज वि पवार हे दिनांक ११ जून २०२४ रोजी बार्टी संस्थेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना पथर ज वि पवार म्हणाले की, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्धीजमच्या बळावरच आपल्या देशाच्या संविधानाची निर्मिती केली. संविधानाने या देशातील जनतेला त्यांचे मुलभूत अधिकार व कर्तव्ये बहाल केली. ज्या ज्या देशांनी बुद्धीजम स्वीकारला ते प्रगतीच्या शिखरावर विराजमान झाले. संविधानाचा प्रसार व प्रचार विद्यार्थी व नागरिकांमध्ये होणे अत्यंत महत्त्वाचे असुन बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या पुढाकाराने बार्टीत दररोज संविधान उद्देशिकेचे सामुहिकपणे वाचन केल्या जाते हा राज्यातील अभिनव उपक्रम सुरू केल्याबद्दल त्यांनी श्री वारे यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी श्री वारे यांनी बार्टी संस्थेच्या वतीने घर घर संविधान, संविधान जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याचे सांगून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनेक पैलूंवर बार्टी संशोधनात्मक कार्य करत असल्याचे नमूद केले.

संविधान कक्षामार्फत राज्यभर संविधान जनजागृती अभियान तसेच प्रकाशन व प्रसिद्धी विभागामार्फत अल्प दरात संविधान, उद्देशिका नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येते.ज वि पवार यांनी मा महासंचालक यांना बार्टी ग्रंथालयासाठी स्वयंलिखित पुस्तकांचा संच भेट दिला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सुबोध मोरे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, अनिल कारंडे, शुभांगी पाटील यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार प्रकाशन विभागाचे रामदास लोखंडे यांनी मानले.

## सुनेत्रा पवारांची बिनविरोध निवड

सांगेन की पक्षात कोणत्याही प्रकारची नाराजी नाही.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, माझ्या उमेदवारीबाबत जनतेतून मागणी होत होती. अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी देखील अशी मागणी केली होती. मात्र मी आमच्या कार्यकर्त्यांना विनंती केली की माझ्या उमेदवारीचा अग्रह धरू नये. मात्र त्यांनी माझ्या उमेदवाराची मागणी लावून धरली, खूप मोठ्या प्रमाणात मागणी झाल्यानंतर पक्षाने हा निर्णय घेतला. सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे देखील राज्यसभेच्या उमेदवारासाठी इच्छुक होते. त्यामुळे सुनेत्रा पवारांच्या उमेदवारी अर्जामुळे ते देखील नाराज असल्याची चर्चा आहे. यावर सुमित्रा पवार म्हणाल्या. पार्थ पवार यांनी देखील मला सांगितलं की कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार तुम्हीच राज्यसभेसाठी अधिकृत उमेदवार असलं पाहिजे. स्वतः पार्थ पवार यांचा देखील तसाच अग्रह होता.

## पिकांना चांगली किमान

निश्र्चित करण्यासाठी पश्र्चिम भारतातील राज्यांच्या प्रतिनिधींची ही बैठक होती.

सह्याद्री अतिथीगृहात आज केंद्रीय कृषि मूल्य व किंमत आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, दीव आणि दमन तसेच महाराष्ट्राच्या प्रतिनिधी व शेतकऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलतांना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगितले व शेतमालाला चांगली किंमत व बाजारपेठ मिळावी यासाठी पंतप्रधानांसमोर आपलं म्हणणं नुकतचं मांडले असल्याचे ते म्हणाले.

लवकरच केंद्रीय कृषिमंत्र्यांना भेटणार

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले की, सोयाबीन, कांदा, कापूस या शेतमालाला चांगली आधारभूत किंमत मिळावी, तसेच शेतकऱ्यांच्या इतर प्रश्र्नी देखील आपण लवकरच केंद्रीय कृषिमंत्र्यांना भेटणार आहोत. आज मिलेटचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असून शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळायचे असेल तर मायक्रो मिलेटस् ना देखील किमान आधारभूत किंमत मिळाली पाहिजे. केंद्र आणि राज्याची विचारधारा एकच असून पंतप्रधान मोदी यांच्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांना चांगले दिवस येत आहेत. गेल्या दहा वर्षात याची प्रचिती आली आहे. पंतप्रधानपदी शपथ घेतल्यावर नरेंद्र मोदींनी सर्वप्रथम पीएम किसान सन्मान निधीच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे. आज राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांसाठी सर्वाधिक निर्णय घेतले असून गेल्या वर्षभरात नुकसान भरपाईपोटी पंधरा हजार कोटी रुपये दिले आहेत.

पर्यावरणाला पूरक बांबूची लागवड

यावेळी मुख्यमंत्र्यांनी वाढत्या प्रदूषण आणि तापमानावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, मी स्वत:ही शेतकऱ्याचा मुलगा असून मी वारंवार संबधित तज्ज्ञ व्यक्तिंशी यावर बोलत असतो. मी गावी गेलो की, आवर्जुन झाडे लावतो. विविध प्रकारची पिके घेतो. गेल्या वर्षभरापासून पर्यावरणाला पूरक अशा बांबू लागवडीला आम्ही मिशन मोडवर सुरुवात केली आहे. आमचे राज्य यामध्ये देशात आघाडीवर असून बांबू लागवडीसाठी सात लाख रुपये हेक्टरी अनुदान शेतकऱ्यांना देण्यात येते. यासाठी दहा लाख हेक्टरचे उद्दीष्ट ही ठरवण्यात आले आहे. बांबूच्या अनेक प्रजाती असून त्याचे वेगवेगळे फायदे आहेत, त्यामुळे टास्क फोर्सच्या माध्यमातून आम्ही येणाऱ्या काळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले उचलत आहोत.

महाराष्ट्र हे देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेमध्ये एक ट्रिलियन डॉलरचे योगदान करण्यासाठी प्रयत्नशील असून यामध्ये शेतीचा देखील मोठा सहभाग असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

प्रतिनिधींकडून स्वागत

केंद्रीय कृषिमूल्य आयोगाच्या बैठकीसाठी खुद्द मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याची घटना देशात पहिल्यांदाच घडली असून यामुळे आता या आयोगाच्या ज्या राज्यांमध्ये बैठका होतील तिथे त्या- त्या मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहण्याचा पायंडा पडेल, असे राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी सांगताच उपस्थित शेतकरी व प्रतिनिधींनी टाळ्यांचा एकच कडकडाट केला. यावेळी बोलतांना पाशा पटेल यांनी मिलेट उत्पादनासाठी मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कशा रितीने पुढाकार घेतला ते सांगितले. पर्यावरणासारख्या महत्वाच्या विषयावर मुख्यमंत्री स्वत: टास्क फोर्सचे अध्यक्ष झाले यावरुन राज्य सरकार या विषयी किती गंभीर याची माहिती त्यांनी दिली. यावेळी कृषि मंत्री धनंजय मुंडे यांनी बोलतांना आयोगाने अधिक सकारात्मक दृष्टीकोनातून शेतकऱ्यांच्या प्रश्र्नांवर विचार करावा व पिकांची किमान आधारभूत किंमत वाढवून मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी विजय पाल शर्मा यांनी देखील आपल्या भाषणात कृषि विस्तार यंत्रणा मजबूत करणे, खतांचा वापर कमी करणे, कृषि यांत्रिकीकरणावर जोर देणे,खरीपामधील पिकांना देखील एमएसपीचा फायदा मिळवून देणे. खाजगी क्षेत्राची भागिदारी व गुंतवणूक वाढविणे यादृष्टीने आयोग काम करत असल्याचे सांगितले.

## बीए, बीकॉम, बीएससी, बीसीए,

विभागाकडून २०२४ च्या उन्हाळी सत्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर होत आहेत. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर व प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ परीक्षा विभागाची टीम परीक्षांचे निकाल लवकरात लवकर जाहीर करण्यासाठी काम करीत आहे. यामुळे परीक्षा संपल्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्ये वेळेवर निकाल जाहीर होत आहेत.वेळेत निकाल लावण्यासाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी, विविध विद्याशाखांचे सर्व अधिष्ठाता, शिक्षक आदींचे सहकार्य लाभत आहे. यंदाच्या वर्षी वेळेच्या आत सर्व अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर होत असल्याने विद्यार्थ्यांमध्येही आनंद आहे. आता नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. ऍडमिशनची प्रक्रिया ही सुरू आहे.

## पायाभूत विकासप्रकल्पांची काम..

शहर आणि उपनगरांची वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी पुणे रिंग रोडचे काम वेगाने मार्गी लावा. या कामासाठी आवश्यक असणारा निधी देण्यात येईल. सातारा येथे उभारण्यात येत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाला गती देतानाच सातारा सैनिक स्कुलचे कामदेखील तातडीने मार्गी लावावे. कोकणाच्या पर्यटनाला चालना देणाऱ्या 'रेवस ते रेडी' किनारा महामार्गाला वेग देण्यासाठी प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावीत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी अलिबागच्या उसर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वडाळा येथील जीएसटी भवन,पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे, 'सारथी'संस्थेचे पुण्यातील मुख्यालय, औंध, नाशिक, कोल्हापूर, नागपूर, अमरावतीतील 'सारथी'च्या विभागीय उपकेंद्रांचे बांधकाम, पुणे येथील कृषीभवन, शिक्षण आयुक्तालय, कामगार कल्याण भवन, सहकार भवन, नोंदणीभवन आदी प्रकल्पांच्या प्रगतीचादेखील आढावा घेतला.

बैठकीस पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, पुणे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी जलज शर्मा, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेशकुमार जयस्वाल,

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, सारथीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक काकडे, वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम देवेंद्रसिंह (सर्व दूरदृश्य प्रणालीद्वारे), उपमुख्यमंत्री कार्यालयाचे उपसचिव गजानन पाटील, पुणे मेट्रो, पीएमआरडीए, संबंधित जिल्ह्यांचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# ..तर नावं घेऊन तुमचे उमेदवार पाडणार, मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मराठा आरक्षणासाठी ८ जून पासून उपोषण सुरु केलेल्या मनोज जरांगेंनी आज सहाव्या दिवशी त्यांचं उपोषण मागे घेतलं आहे. सगे-सोयऱ्यांच्या अंमलजावणीसाठी त्यांनी सरकारला एक महिन्याची मुदत दिली आहे. महत्त्वाचं म्हणजे एक महिन्यात सरकारने मागण्या मान्य केल्या नाही तर नाव घेऊन उमेदवार पाडू असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे. मनोज जरांगे यांनी याआधीही आंदोलनं केली आहेत. त्या आंदोलनांमधून विविध तोडगेही निघालेले महाराष्ट्राने पाहिलं आहे. अशात मनोज जरांगेंनी महत्त्वाचा इशारा सरकारला दिला आहे.राज्य सरकारमधील मंत्री शंभूराज देसाई, राणा जगजितसिंह आणि खासदार संदिपान भुमरे यांनी आज अंतरवाली सराटीत जाऊन मराठा आंदोलनासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगेंची भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षणाबाबत सरकार कशा पद्धतीने काम करत आहे, याबाबतची माहिती त्यांनी मनोज जरांगे यांना दिली. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणीसाठी सरकार दिरंगाई करत आहे, असा गैरसमज मनोज जरांगेंनी यांनी करू घेऊ नये, त्यांनी हा विचार डोक्यातून काढून टाकावा, असं यावेळी शंभूराज देसाई यांनी म्हटलं आहे.



आम्ही दिलेल्या व्याखेप्रमाणे सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी. ५७ लाख नोंदी मिळाल्या आहेत, त्यांचा आधार घेत मराठा आणि कुणबी एकच आहेत असा कायदा आणावा. हैदराबादचे गॅझेट आपल्या राज्यातही लागू करावं. सातारा संस्थानचं गॅझेट लागू करावं. आंतरवली सराटीसह राज्यातील सर्व मराठा आंदोलकांवरचे गुन्हे मागे घ्यावेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना तातडीने प्रमाणपत्र वाटप करावं. या मागण्या मनोज जरांगेंनी शंभूराज देसाईंकडे केल्या आहेत. यानंतर मनोज जरांगे म्हणाले, आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर तर आम्ही आता राजकारणात उतरणार आहोत, तसंच नावं घेऊन उमेदवार पाडणार प्रसंगी काही ठिकाणी उमेदवार देणार नाही पण नावं घेऊन उमेदवार पाडणार एवढं लक्षात घ्या असा थेट इशाराही मनोज जरांगेंनी दिलं आहे. शंभूराज देसाईंनी एक महिन्याचा वेळ मागितला आहे. त्यानुसार हा वेळ दिल्यावर जरांगे यांनी एक महिन्याचा वेळ देत उपोषण स्थगित केलं.लोकसभा निवडणुकीत भाजपा आणि महायुतीला मोठा फटका बसला आहे. त्यातून धडा घेत भाजपा आणि महायुतीने कंबर कसून तयारी सुरु केली आहे. महाविकास आघाडीने १८५ जागा जिंकण्याचा दावा केला आहे. तर आता मनोज जरांगेंनी नावं घेऊन उमेदवार पाडू असा इशारा दिला आहे. त्यामुळे सरकार नेमकं मराठा आरक्षणाबाबत आणि सगे सोयऱ्यांच्या अंमलबजावणीबाबत काय निर्णय घेणार? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. तसंच सरकारने दिलेल्या मुदतीत अंमलबजावणी केली नाही तर मनोज जरांगे राजकारणात उतरणार का? तसंच कुणाकुणाला पाडणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बकरी ईदच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेसाठी करावं सर्वांनी सहकार्य : पोलीस आयुक्त एम. राजकुमार




**बैठकीत करण्यात आलेल्या सूचना** ❋ कोणतीही खाजगी व्यक्ती अथवा कोणत्याही संघटनांचे कार्यकर्ते यांनी गोवंशीय जनावरांची वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आल्यास स्वतः अवैधपणे वाहन अडविणार नाहीत. ❋ कुर्बानी नंतर सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर किंवा उघड्यावर कोणतीही घाण, रक्त किंवा मांस पडणार नाही, याची दक्षता घ्यावी. ❋ स्वच्छतेचे पालन करुन रोगराई, दुर्गंधी पसरणार नाही, याची दक्षता घ्यावी. ❋ नागरिकांनी कोणत्याही स्थितीत चुकीच्या अफवांवर विश्र्वास न ठेवता सामंजस्याने वागावे. सोशल मिडीयाद्वारे कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, व्हिडीओ फॉरवर्ड न करता ते डिलीट करुन जातीय सलोखा अबाधित राखावा. ❋ एखादी अप्रिय अथवा चुकीची घटना आजूबाजूला घडत असल्यास स्थानिक पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्ष येथे त्वरीत माहिती द्यावी. ❋ कोणत्याही धार्मिक स्थळी आक्षेपार्ह भाष्य/वक्तव्य केले जाणार नाही, याची संबंधितांनी खबरदारी घ्यावी. ❋ बकरी ईदच्या अनुषंगाने नमाजाचेवेळी प्रत्येक ईदगाह येथे आवश्यकतेनुसार जबाबदार स्वयंसेवक नेमावेत. उपरोक्त सुचनांचे पालन करुन कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी सर्वांनी सहकार्य करावं, असं आवाहनही यावेळी करण्यात आले.

**सोलापूर/दैनिक यशसिध्दि न्यूज :** बकरी ईदच्या अनुषंगाने नमाजाचेवेळी प्रत्येक ईदगाह येथे आवश्यकतेनुसार जबाबदार स्वयंसेवक नेमावेत. उपरोक्त सुचनांचे पालन करुन कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी सर्वांनी सहकार्य करावं, अशी सूचना शांतता कमिटीच्या बैठकीत करण्यात आली. बकरी ईद पार्श्र्वभूमीवर कोणीही, कोणत्याही प्रकारे गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक, गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे कुर्बानी देणार नाही, याची सक्त नोंद घ्यावी. गोवंशीय प्राण्यांची अवैधपणे वाहतूक निदर्शनास आल्यास स्थानिक पोलीसांशी किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असं आवाहन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

बकरी ईद उत्सव चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी, १३ जून रोजी ११.०० वा. पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, शहर काझी, मुस्लीम धर्मगुरु, शहरातील प्रमुख मस्जिदचे विश्र्वस्थ, शहारातील प्रमुख ईदगाह मैदान यांचे विश्र्वस्थ यांची पोलीस आयुक्त कार्यालय येथे संयुक्तपणे बैठक आयोजित केली होती.

या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना पोलीस आयुक्त एम. राजकुमार बोलत होते.

या बैठकीची प्रस्तावना पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्रीमती डॉ. दिपाली काळे यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या. त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगर पालिका अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघून समस्या सोडविण्यात येतील, असे सांगितले.पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसन केले.

उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये, कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परिसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. नियमांचे पालन करावे, योग्य बदोबस्त नेमू, असे सांगून बकरी ईद निमित्त शुभेच्छा देऊन बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

या बैठकीस पोलीस आयुक्त एम. राजकुमार पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्रीमती डॉ. दिपाली काळे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ) विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (विभाग-१) अशोक तोरडमल, विभाग-२ - अजय परमार, यशंवत गवारी (वाहतुक शाखा), श्रीमती. प्रांजली सोनवणे (गुन्हे शाखा), तसेच सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी मठपती, महावितरण अति. कार्यकारी अभियंता प्रदिप मोरे, व सहा आयुक्त पशुसवंर्धन अधिकारी विशाल येवले, सोमपा पशु चिकित्सक भरत शिंदे तसेच सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार, शांतता कमिटीचे सदस्य, पत्रकार बंधु उपस्थित होते.

# थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाइन कॅप रजिस्ट्रेशन सुरु

## स्वेरीत ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दी न्यूज**
'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया बुधवार, दि.१२ जुन २०२४ पासून सुरु झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरीच्या डिप्लोमा इंजिनिअरिंग महाविद्यालयास फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी.६४३७) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. या ऑनलाईन रजिस्ट्रेशनची प्रक्रिया बुधवार, दि.०३ जुलै २०२४ रोजी सायं.





५:०० वाजेपर्यंत चालणार आहे.' अशी माहिती डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ यांनी दिली.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली व डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीच्या डिप्लोमा महाविद्यालयामध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशनची ही प्रक्रिया बुधवार, दि.१२ जुन २०२४ पासून ते बुधवार, दि.०३ जुलै २०२४ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत चालणार असून यामध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड करणे, कागदपत्रांची पडताळणी करणे आणि कन्फर्मेशन करणे आदी प्रक्रिया चालतील. रजिस्ट्रेशन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे सोबत आणावीत. पदविका अभियांत्रिकीच्या थेट द्वितीय वर्ष रजिस्ट्रेशन साठीचे शुल्क खुला प्रवर्ग- रु. ४०६/- आणि इतर प्रवर्ग- रु.३०६/- असे आहे. रजिस्ट्रेशन फी ऑनलाईन भरण्यासाठी एटीएम किंवा रोख रक्कम आणावी. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी व कन्फर्मेशन करण्यासाठी प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेच्या रजिस्ट्रेशन व कन्फर्मेशन नंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणे, प्रथम, द्वितीय व तृतीय अशा तीन फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरणे आदी प्रक्रिया होतील. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर सविस्तर माहिती दिली आहे. थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा (पदविका) च्या प्रवेशाचा लाभ बारावी सायन्स उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना घेता येणार आहे. थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या प्रवेशासाठी प्रा.सचिन तोरणे (मोबा.नं.-९८६००२४९९३) व प्रा. आकाश पवार (मोबा.नं.-९५११२०८१३९) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. प्रवेशासंदर्भातील प्रक्रियेत होणाऱ्या संभाव्य चुका टाळण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन आपला अर्ज भरावा व कन्फर्मेशन करून घ्यावे.' असे आवाहन करण्यात आले आहे.

# खासदार झाल्यानंतर प्रथमच मंगळवेढा दौऱ्यावर आलेल्या प्रणिती शिंदेंचा 'टमटम'मधून प्रवास!

**मंगळवेढा/दैनिक यशसिध्दि न्यूज**
मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ येथील ग्रामदैवत कामसिद्ध देवाची यात्रा भरली होती. कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे कामसिद्ध देवीच्या दर्शनासाठी प्रथमच खासदार झालेल्या प्रणिती शिंदे यांनी हजेरी लावली होती.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे प्रथमच बुधवारी (ता. १२ जून ) मंगळवेढा दौऱ्यावर आल्या होत्या. या दौऱ्यात प्रणिती शिंदे यांनी चक्क 'टमटम'मधून (छोटा टेंपो) केलेला प्रवास चर्चेचा विषय ठरला आहे.प्रणिती शिंदे यांनी खोमनाळ येथील ग्रामदैवत कामसिद्ध देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर सोलापूर लोकसभा मतदारसंघातून आमदार प्रणिती शिंदे विजयी होणार की आमदार राम सातपुते विजय होणार यावर दहा हजार रुपयांची शर्यत लागली होती.

त्यात खोमनाळ येथील मच्छिंद्र इंगोले यांनी प्रणिती शिंदे जिंकतील, असा दावा केला होता.निकालानंतर सोलापूरमधून प्रणिती शिंदे जिंकल्याचे स्पष्ट झाले. ही शर्यत जिंकणारे मच्छिंद्र इंगोले यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. देवीच्या पालखीची मिरवणूक सुरू झाल्यानंतर शिंदे यांनी पालखीचे दर्शनही घेतले.



पालखी दर्शनानंतर काही कार्यकर्त्यांनी चहापानासाठी प्रणिती शिंदे यांना घरी येण्याचा आग्रह केला. खासदार शिंदे यांनीही कार्यकर्त्यांना आग्रह न मोडता त्यांची इच्छा पूर्ण केली.

छोटा टेंपो असल्यामुळे चालकानेही गर्दीतून वाढत काढत प्रणिती शिंदे यांना काँग्रेस कार्यकर्ते सुधाकर कांबळे यांच्या घरापर्यंत पोचवले. शिंदे यांनीही कार्यकर्त्याला न दुखावत त्यांची इच्छा पूर्ण केली. प्रणिती शिंदे यांनी आपली गाडी सोडून दुधाच्या गाडीतून केलेला हा प्रवास मंगळवेढ्यात चर्चेचा ठरला आहे.

अलीकडच्या काळात राजकीय नेते शक्यतो आपल्या किंवा कार्यकर्त्यांच्या मोटारीतूनच प्रवास करतात. पूर्वी काही आमदार हे एसटी बसधून प्रवास करायचे. मात्र, आता हे चित्र दुर्मिळ झाले आहे. पण, मंगळवेढ्याच्या दौऱ्यावर आलेल्या खासदार प्रणिती शिंदेंनी दुधाच्या गाडीतून केलेला प्रवास चर्चेत आला आहे. काँग्रेस कार्यकर्ते सुधाकर कांबळे यांच्या घरापर्यंत जाण्यासाठी पुरेसा रस्ता नव्हता.

खासदार शिंदे यांची गाडी कांबळे यांच्या घरापर्यंत जात नव्हती. गर्दीतून मोटारीसाठी वाट काढणे, अडचणी ठरू लागले, त्यावेळी मंगळवेढ्यावरून निंबोणीकडे जाणाऱ्या दुधाच्या गाडी चालकाला हात करून काँग्रेस कार्यकर्ते सुधाकर कांबळे यांच्या घरापर्यंत सोडण्याची विनंती केली.

# पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्य प्रमाणे विकसित होऊ द्यावे : इंद्रजीत देशमुख

## गुणवंत विद्यार्थी संधी मिळाल्यास विविध क्षेत्रात यश संपादित करू शकतो : आमदार समाधान आवताडे






### कै. महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठान मंगळवेढा यांच्या वतीने गुणवंत वद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि मार्गदर्शन शिबिर

**पंढरपूर /दैनिक यशसिध्दि न्यूज**
पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या संकल्पनेतून कै. महादेवराव आवताडे प्रतिष्ठान मंगळवेढा यांच्या वतीने पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील इयत्ता दहावी आणि बारावी मध्ये घवघवीत यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आणि मार्गदर्शन शिबिराचे आयोजन गुरुवारी पंढरपूर येथील श्रेयश पॅलेस येथे करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रसिद्ध व्याख्याते व माजी सनदी अधिकारी इंद्रजीत देशमुख म्हणाले की

सध्याच्या सोशल मीडियाच्या जमान्यात विद्यार्थ्यांनी आपला कल ओळखून आपले करिअर घडवावे पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्य प्रमाणे विकसित होऊ द्यावे असे मार्गदर्शन आपल्या अध्यक्ष भाषणातून इंद्रजीत देशमुख यांनी केले. यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की आपल्या ग्रामीण भागात देखील अनेक विद्यार्थी गुणवान आहेत. त्यांना योग्य संधी मिळाल्यास ते विविध क्षेत्रात मोठे यश संपादन करू शकतात त्यामुळे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे आपली कर्तव्य आहे. यासाठी कार्यक्रम आयोजित केल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी बोलताना सांगितले.पंढरपूर येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध व्याख्याते व माजी सनदी अधिकारी इंद्रजीत देशमुख हे होते तर बक्षीस वितरण आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाले

या कार्यक्रमात दहावी आणि बारावी मध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा स्कूल बॅग व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे तहसीलदार सचिन लंगोटे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके गटविकास अधिकारी सुशील संसारे व गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# ना.रामदास आठवले यांनी सलग तिसऱ्यांदा मंत्री पदाची धुरा

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले यांनी सलग तिसऱ्यांदा मंत्री पदाची शपथ घेतल्याने तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले) च्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

लोकसभा निवडणुकीनंतर नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या शपतविधी सोहळ्यात रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले यांनी सलग तिसऱ्यांदा भारताच्या केंद्रीय मंत्री मंडळात मंत्री पदाची शपथ घेतल्याने नळदुर्ग येथे रिपाइं कार्यकर्त्यांनी येथील बसस्थानका समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात बॅनरनबाजी करून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करून जल्लोष केला. याप्रसंगी रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, अल्प संख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष बाशिदभाई कुरेशी, तालुका कार्यकारणी सदस्य दत्ता बनसोडे नळदुर्ग शहर उपाध्यक्ष दत्ता सुरवसे रिपाइं चे जयभीम वाघमारे, जेष्ठ कार्यकर्ते नामदेव आण्णा बनसोडे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

